३५.

शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेला
बदली प्रवासभत्ता.
संयुक्त बदली अनुदानासंबंधी सुधारणा.

## महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय, क्रमांक:प्रवास-१००५/प्र.क्र.८०/सेवा-५,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक: ६ जानेवारी, २००६.

पहा:- (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१०९८/प्र.क्र.७४/ ९८/सेवा-५, दिनांक ४ डिसेंबर, १९९९.
(२) शासन शुध्दिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१०९८/प्र.क्र.७४/ ९८/सेवा-५, दिनांक ७ डिसेंबर, १९९९.
(३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:मभवा-११०४/प्र.क्र.५/सेवा-९, दिनांक १९ जुलै, २००४.

### निर्णय

शासकीय कर्मचाऱ्याची बदली झाल्यावर, त्याने निवासस्थान बदलले असल्यास त्याला वर (१) व (२) येथील आदेशांतील तरतूदीनुसार संयुक्त बदली अनुदान मंजूर करण्यात येते. संयुक्त बदली अनुदान मंजूरीचे निकष आणि त्याचे दर सुधारण्याचा प्रश्न काही काळ शासनाच्या विचाराधिन होता.

२. शासन या संदर्भात आता असे आदेश देत आहे की, शासकीय कर्मचाऱ्याची बदली झाल्यावर त्याला खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे संयुक्त बदली अनुदान मंजूर करण्यात येईल. मात्र त्यासाठी बदलीनंतर त्याच्या निवासस्थानात बदल होण्याची अट यापुढेही लागू राहील.

### तक्ता

| अ.क्र. | बदलीचा प्रकार | संयुक्त बदली अनुदानाचा दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | त्याच मुख्यालयात | मूळ वेतनाच्या १/३ इतकी रक्कम |
| २ अ) | नवीन व जुन्या मुख्यालयातील अंतर २० किलोमिटर पेक्षा कमी असल्यास | मूळ वेतनाच्या १/३ इतकी रक्कम |
| २ ब) | नवीन व जुन्या मुख्यालयातील अंतर २० किलोमिटर वा त्यापेक्षा अधिक असल्यास | मूळ वेतनाएवढी रक्कम |

*टीप : वरील (३) येथील आदेशानुसार संयुक्त बदली अनुदानाची वरीलप्रमाणे परिगणना करताना मूळ वेतनात महागाई वेतनाची रक्कम मिळवून परिगणना करावयाची आहे.*

आवक नं. -
14 FEB 2006
पृ. क्र. -
कार्यविवरण नं. -
प्र. लि. जिल्हाधिकारी

सर्व तहसिलदार/SDO/ SLAO/ Dy Collector यांना पाठवावे

४४

ROTA| H 1448 (8000+20-1-06)

३. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होतील. त्यामुळे त्या दिनांकास किंवा त्यानंतर कर्मचाऱ्याची बदली झाली असेल वा तो सेवानिवृत्त झाला असेल तर अशी प्रकरणे या आदेशातील तरतूदीनुसार निकाली काढण्यात यावीत.

४. हे आदेश शासनाच्या खालील संकेतस्थळांवर (Web sites) उपलब्ध होऊ शकतील:—

(i) finance.mah.nic.in

(ii) www.maharashtra.gov.in

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नसीमा म. शेख

उपसचिव, वित्त विभाग.

प्रति,

- महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
- महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
- प्रधान महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
- महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
- अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
- निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
- राज्यपालांचे सचिव,
- मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
- उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
- सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
- मंत्रालयीन सर्व विभाग,
- सर्व विभागीय आयुक्त,
- मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
- *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
- *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
- *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
- *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
- *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
- सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
- संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
- मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
- उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती,
- जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
- सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
- सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
- सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
- वित्त विभागातील सर्व कार्यासने,
- निवडनस्ती, वित्त विभाग/सेवा-५

* पत्राद्वारे

H 1448-13

प्रमुख लिपिक

जिल्हाधिकारी रत्नागिरी.